# Recent Trends and Issues in Languages, Social Sciences and Commerce

Date of Publication
04 Jan. 2020

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता .कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary.*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 6.021 iijif

Cosmos IMPACT FACTOR 5.234

Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com

विद्यावार्ता : Interdisciplinary Multilingual Refereed Journal Impact Factor 6.021(IIJIF)

| | | | |
|---|---|---|---|
| 110 | डॉ. हेमंत नामदेव कुंभार | समकालीन मराठी चित्रपट | 497 |
| 111 | प्रा.डॉ.संजय नगरकर<br>सचिन माधवराव कोतकर | मराठी कादंबरीतील स्थलांतरितांचे चित्रण– एक सामाजिक अभ्यास | 501 |
| 112 | प्रा. राजश्री बं. पोवार | समकालीन मराठी नाटकामधील कुटुंबव्यवस्थेचे चित्रण | 505 |
| 113 | प्रा. अविनाश वसंतराव पाटील | सामाजिक संवेदना की दृष्टि से हिंदी साहित्य का महत्व " | 509 |
| 114 | Mr. Ashok V. Jadhav | Review of MGNREGA through promotion of sericulture business in Maharashtra | 512 |
| 115 | डॉ. राजश्री बाबुराव मालेकर | सविनय कायदेभंग चळवळ | 517 |
| 116 | श्री नवनाथ लक्ष्मण गायकवाड | ब्राह्मणेत्तर चळवळीतील छत्रपती शाहू महाराजांचे योगदान | 520 |
| 117 | कु. पाटील सायली विठोबा<br>कु. लवते कोमल आनंदा<br>कु. वाघ प्रतिभा शिवाजी | मलकापूर परिसराचा ऐतिहासीक, सामाजिक व आर्थिक अभ्यास | 522 |
| 118 | Smt.Jayshri G. Patil | The Female Subaltern Sohini in *Untouchable* by Mulk Raj Anand | 525 |
| 119 | Prof. M. V. Kamble | Portrayal of rural India in Kamala markandaya's Nectar in a sieve | 528 |
| 120 | कु. नम्रता संतोष कोपरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणादायक विचारांची समकालातील आवश्यकता | 530 |
| 121 | प्रा.डॉ.संजय नगरकर<br>प्रा.सचिन माधवराव कोतकर | मराठी कादंबरीतील स्थलांतरितांचे चित्रण– एक सामाजिक अभ्यास | 532 |
| 122 | Mr.Somnath V. Panade | Post- Apartheid Society in Lisa Fugard's *Skinner's Drift* | 535 |
| 123 | Mrs. Urmila S. Shendage | Study of The Views Of Shopkeepers On Digital Economy | 539 |
| 124 | Mr. S.B. Shinde | The study of the contribution of Nimbkar Agricultural Rural Institute in Community Development | 543 |
| 125 | प्रा. किसन भा. वाघमोडे | तीसरी ताली' उपन्यास में किन्नरों की त्रासदी | 547 |
| 126 | Miss.Shahien Mujawar | Eco-Feminism in Indian English Literature | 551 |
| 127 | Ms. Prachi A. Mane | Role of Sahajayoga Meditation in enhancing Self-Esteem | 553 |
| 128 | डा.ई.नागरत्ना | शिक्षा क्षेत्र मे आधुनिक तकनिकी का प्रयोग | 557 |
| 129 | Smt. Lavate S.N. | Various Techniques to develop the Communication Skills of Foreign Language | 562 |
| 130 | प्रा. दत्तात्रय मारुती काळेल | लहान राज्यांची वाढती मागणी | 564 |
| 131 | Shri. Bhanvase Krishna | Position of Satyashodhak Movement in social History of Maharashtra: A brief study | 568 |
| 132 | डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे | माती पंख आणि आकाश : एक भावस्पर्शी आत्मकथन | 571 |
| 133 | Jinmati S. Murgunde | Recent Trends In Business Management | 576 |

## मराठी कादंबरीतील स्थलांतरितांचे चित्रण— एक सामाजिक अभ्यास

सचिन माधवराव कोतकर
संशोधक विद्यार्थी, अहमदनगर कॉलेज,
अहमदनगर

प्रा.डॉ.संजय नगरकर
मराठी विभाग प्रमुख,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,औंध,पुणे

---

**प्रास्ताविक :—**

मनुष्यप्राणी हा समूहप्रिय म्हणून ओळखला जातो. मानवाचे 'समूहनिष्ठाता' हे एक वैशिष्ट्य आपणास पहावयास मिळते; परंतु काही कारणास्तव त्याला आपला भूभाग, समाज,सोडून दुसरीकडे स्थलांतरीत व्हावे लागत असते. स्थलांतरित होण्याची प्रक्रिया ही प्राचीन काळापासून चालू असल्याचे जाणवते. आजच्या २१ व्या शतकातदेखील लोकसमूहाला आपल्या परिसरातून हद्दपार व्हावे लागते. अगदी अलीकडे ऑगस्ट २०१५ मध्ये आय.एस. च्या दहशतवादाला कंटाळून इराक आणि सिरियामधून अनेक अरब लोकांना निर्वासित होण्याची वेळ आली होती. त्याचा फार मोठा विपरित परिणाम समाज मनावर होत असतो. तसेच विस्थापित होत असताना झालेल्या हालअपेष्टा, अत्याचार, अन्याय यांचा प्रभाव पुढील पिढीवर होत असतो.

स्थलांतरित होण्याची कारणे पुढील प्रमाणे

**निसर्गनिर्मित कारणे :—**

नैसर्गिक आपत्तीच्या झळा मानवाला पूर्वीपासूनच बसत आलेल्या आहेत.कारण निसर्ग कधी रौद्ररुप धारण करेल याविषयी वैज्ञानिकांनाही अंदाज घेता येत नाही. आणि मानवाने जेव्हा जेव्हा निसर्गावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा मानवाला नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागला आहे. महापूर ही अशी नैसर्गिक आपत्ती आहे की, ज्यामुळे अनेक गावेच्या गावे कायमची विस्थापित झाली आहेत. डिसेंबर २००४ मध्ये आलेल्या त्सुनामीमुळे इंडोनेशिया, श्रीलंका आणि भारतातील तामिळनाडू, आंध्रप्रदेश किनारपट्टीवरील अनेक कुटुंबांना स्थलांतरित व्हावे लागले होते. दुष्काळाच्या झळा मानवाला प्राचीन काळापासून सोसाव्या लागत आलेल्या आहेत. १९७२ मध्ये पडलेल्या महाराष्ट्रातील दुष्काळामुळे अनेक कुटुंबांना आपले घरदार सोडून परागंदा व्हावे लागले होते. २०१४ मध्ये भूस्खलन होऊन पुणे जिल्ह्यातील माळीण हे संपूर्ण गावच डोंगराखाली गडप झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमधून वाचलेल्या लोकांना शेवटी स्थलांतरितच व्हावे लागले आहे. लोक समूहाला सर्वात जास्त प्रमाणात विस्थापित होण्यास भाग पाडणारी नैसर्गिक आपत्ती म्हणजे भूकंप होय. गणेश विसर्जनाच्या दिवशी १९९३ मध्ये झालेला लातूर — किल्लारीमध्ये झालेल्या भूकंपामुळे अनेकांना विस्थापित व्हावे लागले होते. तसेच गुजरातमधील भूज मध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपामुळे देखील अनेक कुटुंबांना स्थलांतरित व्हावे लागले होते.

**मानवनिर्मित कारणे—**

मानवाने आपल्या भौतिक सुखसुविधा पूर्ण करण्यासाठी विविध स्वरुपाचे प्रकल्प उभारले आहेत. त्यासाठी प्रसंगी जंगल संपत्ती ही नष्ट केली आहे. दळणवळणाची साधने जसे रेल्वे,उड्डानपूल,विमानतळ,महामार्ग करण्याच्या प्रयत्नात तेथील भूमिपुत्रांवर विस्थापित होण्याची संकट ओढावत असते. पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी, वीज निर्मितीसाठी, धरणां सारख्या प्रकल्पांची निकड मोठ्या प्रमाणात भासू लागली परिणामी अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी,

भालचंद्र देशपांडे यांनी १९९३ च्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर २००५ मध्ये लिहिलेली 'आणि धरणीकंप होत राहिला' या कादंबरी मधून भूकंपग्रस्त प्रवृत्तीचे चित्रण केलेले दिसते. जगभरातून आलेला मदतीचा ओघ त्यांच्या वाटपातील सावळागोंधळ परदेशातून आलेल्या वस्तू दुकानांमध्ये विक्रीसाठी येणे खोट्या स्वयंसेवी संस्था स्थापन करून पैसा गोळा करणे, खोट्या नोंदी करून मदतनिधी मिळविणे अशा घटनांचे चित्रण कादंबरीत पहावयास मिळते. भूकंपग्रस्त भागात राहणाऱ्या तरुणांना मुली देण्यास कोणी पुढे येत नाही. मोठ्या स्वरूपात वाढलेली असुरक्षितता, वैफल्यग्रस्ततेमुळे वाढत चालेली अंधश्रद्धा फुकटच्या पैशामुळे वाढत चाललेली व्यसनाधिनता घरातील कर्ते माणसे भूकंपात गेल्यामुळे बऱ्याच जणांस वैफल्याने ग्रासलेले दिसते. परिस्थितीमुळे असाह्य, लाचार बनत चाललेल्या भूकंप पीडीतांचे चित्रण या कादंबरीत केल्याचे पहावयास मिळते.

मराठी कादंबरी मध्ये निरनिराळ्या कारणांनी स्थलांतरीत झालेल्या समाजाचे चित्रण सामाजिक दृष्टिकोनातून केल्याचे दिसते. हे विस्थापन भूकंपामुळे, दंगलीमुळे, धरणांमुळे, औद्योगिकरणामुळे झालेले स्थलांतरण मराठी कादंबरीचा विषय झालेला दिसतो. स्थलांतरीतांचे प्रश्न त्यांच्या समोर उभी ठाकलेली संकटे, जीवन जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष याचे प्रत्ययकारी चित्रण कादंबऱ्यांतून आपणास पहावयास मिळते. देशाचा विकास करण्याच्या प्रयत्नां मध्ये भूमिपुत्रांना मात्र आपले सर्वस्व गमावण्याची वेळ येत असते. अशा भूमीपुत्रांचे पुनर्वसन केल्यानंतरही त्यांची ससेहोलपट मात्र संपताना दिसत नाही.

**संदर्भ ग्रंथः—**

१. डॉ.वासुदेव मुलाटे,'ग्रामीण कादंबरी:प्रारंभ ते १९६०',समा.'ग्रामीण मराठी वाङ्मयाचा इतिहास',संपा. नलगे चंद्रकुमार, रिया पब्लिकेशन,कोल्हापूर, ऑगस्ट २०१३ पृ. १३
२. डॉ.नगरकर संजय, महाराष्ट्रातील विस्थापित आणि मराठी कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे,जानेवारी २०१५,पृ. १०२